**कायम विना अनुदान तत्वावरील प्राथमिक शाळा परवानगीचे आदेश.**

**महाराष्ट्र शासन**

क्रमांकः नप्राशा- १७०६/(११४/२००६)/प्राशि -३
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ मे, २००६.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,लातूर,नागपूर,अमरावती.

**विषय : सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाची खाजगी प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.**

सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यांस परवानगी मिळण्याकरीता शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या आधारे तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन सोबत जोडलेल्या यादीतील ३७७ (तीनशे सत्याहत्तर) शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या ठिकाणी सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही, या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास "जून २००५" पासून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

२. सदर परवानगी शासनपत्र क्रमांक : व्हीएलएस १०००/(५०९/२०००)/(१)/प्राशि-३, दिनांक २१ जुलै, २००० मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

३. याबाबतची आवश्यक ती पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, तसेच शासनपत्र दिनांक २१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

४. प्राथमिक शाळेस शासन परवानगीचे आदेश कळविण्यापूर्वी ज्या ठिकाणी शाळेला परवानगी द्यावयाची आहे त्या ठिकाणी निवडणूक आचारसंहिता लागू आहे किंवा कसे याबाबतची माहिती

वेभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संबंधित जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी /जिल्हाधिकारी यांचेकडून घेऊन याची खात्री करुन मगच परवानगीचे आदेश संबंधित संस्थेस कळविण्यात यावेत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित वेभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

१. सदर शासनपत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००६०५१६२१०५००००१ असा आहे.

( भि.य. मंता )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

त :- माहिती व तात्काळ आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
३) मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५) मा. सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक / निवड नस्ती- प्राशि-३

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वाघोली, हवेली, पुणे | | | |
| ३८ | कासेगांव एज्युकेशन सोसायटी, राजाराम इन्स्टिटय़ुट ऑफ टेकनॉलॉजी, राजारामनगर, ता.वाळवा, जि.सांगली | आंबेगाव | इंग्रजी | १ ली |
| ३९ | कासेगांव एज्युकेशन सोसायटी, राजाराम इन्स्टिटय़ुट ऑफ टेकनॉलॉजी, राजारामनगर, ता.वाळवा, जि.सांगली | कुन्हेनामा, ता.मावळ | इंग्रजी | १ ली |
| ४० | कासेगांव एज्युकेशन सोसायटी, राजाराम इन्स्टिटय़ुट ऑफ टेकनॉलॉजी, राजारामनगर, ता.वाळवा, जि.सांगली | जांबे, ता.मुळशी | इंग्रजी | १ ली |
| ४१ | संभाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सर्व्हे नं.७४, सय्यदनगर, महम्मदवाडी, हडपसर, पुणे | पिसोळी, ता.हवेली | इंग्रजी | १ ली |
| ४२ | डॅनियल एज्युकेशन सोसायटी, सर्व्हे नं.७८, प्लॉट नं.३, सवेरा अपार्टमेंट, समर्थनगर, नवी सांगवी | राहटणी, काटेनगर, जगताप डेरी | इंग्रजी | १ ली |
| ४३ | योगिराज बहुउद्देशिय शिक्षण मंडळ, सेक्टर नं.१, प्लॉट नं.७३, कोयनानगर, चिंचवड | जाधववाडी | इंग्रजी | १ ली |
| ४४ | श्री शिवाजी मराठा सोसायटी, ४२५ शुक्रवारपेठ, पुणे | बोरी पारधी | इंग्रजी | १ ली |
| ४५ | श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, वडगाव, ता.मावळ | मावळ | इंग्रजी | १ ली |
| ४६ | साध्वी प्रिती सुधाजी एज्युकेशन प्रतिष्ठान, हिंजवडी | पुणे | इंग्रजी | १ ली |
| ४७ | बेन एज्युकेशन सोसायटी, निगडी | मोरेवैस्ती, चिखली | इंग्रजी | १ ली |
| एकूण (४७) प्राथमिक शाळा | | | | |